


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ६२८२
IRBK-0106252

# ते पाणी

श.रा.दवळे
र.म.जोशी

२२५२



# पुराचें पाणी

न व सा क्ष रां सा ठीं
सु बो ध क था


☆

शं. रा. देवळे
रं. म. जोशी निर्मळ

विभाग ८२३
क्रमांक [illegible]
IRBK-0106252
IRBK-0106252

चित्रशाळा प्रकाशन
ज्ञानदीप लावूं जगीं

किंमत आठ आणे




मु द्र क व प्र का श क
दामोदर त्र्यंबक जोशी,
बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६, सदाशिव, पुणें २.

☆

प्र थ मा वृ त्ति
ए प्रि ल १ ९ ५ ७

☆

सर्व हक्क स्वाधीन





# अ नु क्र म

१. ओळख ३
२. हिऱ्यावरचा चिखल ४
३. भयंकर संकट ८
४. माणुसकी जागी झाली. १२
५. सारेजण कामाला लागले. १६
६. नवापूर आणि नवा पूल २०
७. पाणीच पाणी २४
८. सुखी जीवन २९

☆







: १ :

## ओळख

" अहाहा, किती गार सावली! कसं छानदार पाणी! असं वाटतं कीं, थांबावंच इथं घटकाभर. भाकरी खावी, थोडा विसावा घ्यावा आणि मग पुढचा रस्ता धरावा."

असा रामजीनं बेत केला, आणि तो तिथंच थांबला.

त्यानं घोड्याचा लगाम सोडला, त्याला पाणी पाजलं आणि डुंगरी-वरच्या हिरवळीवर त्याला चरायला सोडलं.

रामजीनं पडशी सोडली, शिदोरी काढली, नदीची शोभा पाहातपाहात सपाटून जेवण केलं. तो पोटभर पाणी प्याला आणि नदीकांठच्या झाडा-खालीं गार सावलींत जरा आडवा झाला. झटकन् त्याला डोळा लागला.

नदीची धार खळखळ वाहात होती. ती जणूं रामजीशीं बोलत होती. ती आपली कहाणी रामजीला सांगत होती.

☆ ☆ ☆



: २ :

## हिऱ्यावरचा चिखल

ऐकलं का रामजी,
आतां तर कांहींच पाणी नाहीं मला.
पूर्वीं फार फार पाणी असायचं बरं का !
पावसाळ्यांत तर मी दुथडी भरून वाहायची.
खूप खूप पाणी वाहून न्यायची.
खूप खूप गाळ वाहून आणायची.
चार महिने नुसती चंगळ चालायची.
पण पुढें मात्र माझा प्रवाह आटून जायचा आणि
माझ्यांत मधें मधें मोठमोठे डोह निर्माण व्हायचे.
खूप खोल असायचे ते.
खूप पाणी असायचं त्यांत.
पण खरं सांगूं ?
उपयोग काय त्या डोहांचा ?
पुराचं इतकं पाणी फुकट वाहून जायचं.
पण, माणसांनीं कधीं विचारच केला नाहीं त्याचा.

मला खूप वाईट वाटे, पण काय करणार मी ?

फार फार जुन्या काळची गोष्ट. माणसांची एक टोळी फिरत फिरत आली. त्यांनीं मला पाहिलं. पाण्याची सोय झाली. माणसांनीं माझ्याकांठीं वसती केली. मला भारी आनंद झाला.

माझ्या कांठावर जंगल होतं. खूप मोठं आणि खूप दाट. त्या जंगलांत रानटी पशु होते. ते रोज सकाळ संध्याकाळ पाणी प्यायला यायचे, पाणी पिऊन झालं कीं निघून जायचे. आतां माणसं आलीं. तीं माझ्या जवळच थांबूं लागलीं. तीं माझं पाणी पीत, माझ्या पाण्यांत आंघोळ करीत आणि माझ्या पाण्यानं कपडे धुवीत. माझा त्यांना फार उपयोग. त्यांचं माझ्यावर भारी प्रेम.

पण खरं सांगूं का ? पुढं पुढं मला या माणसांचा खूप राग यायचा. असं वाटायचं कीं, या माणसांपेक्षां हीं जंगलीं जनावरंच चांगलीं. हीं माणसं माझी फार नासाडी करीत, रोज माझं पाणी खराब करीत, कांठावर घाण करीत. उघड्या डोळ्यांनीं मीं तें सारं पाहिलं; पण प्रेमामुळं डोळे झांकून मीं तें सारं सोसलं. त्यांचीं पापं धुऊन नेलीं. वाटलं, आज ना उद्यां सुधारतील हीं माणसं !

पण छे ! माणसांना विचारच नाहीं. त्यांना माझी किंमतच कळेना. बरोबरच आहे, फुकटच्या पाण्याला कसली किंमत ? मीं खूप विचार केला, कसं सुधारावं या माणसाला ?

रात्रंदिवस हाच विचार माझ्या डोक्यांत घोळत असे. त्या विचारानं मी वाळून जात असे. माझ्या कांठीं येणारीं माणसं, गुरं-ढोरं लाहालाहा करीत येत; माझ्याकडे पाहात आणि दीनवाणी होत असत. मलाहि भडभडून येई. माझ्या कांठावरचीं झाडंझुडपं सुद्धां माना टाकीत. उन्हाळ्यांत तर त्यांचा रखरखीतपणा भारीच वाढे. मग मात्र मला राहावयाचं नाहीं. वाटे, या बिचाऱ्यांनीं काय केलं आहे ?

माझा सारा राग लांब पळून जायचा. मी सारं कांहीं विसरायची. नेहमींप्रमाणं पावसाळ्यांत दुथडी भरून जायची. गुरंढोरं, पोरबाळं, झाडंझुडपं, पुन्हां ताजीतवानीं दिसायचीं. मीहि मनांत म्हणत असे "त्यांना एक कळत नाहीं. म्हणून आपणहि आडमुठेपणानं वागायचं का?"

पण दरवर्षीं तेंच! माणसांच्या दुर्गुणावर पांघरूण घातलं कीं, तीं कोडगीं होतात. विजेसारखा हा विचार आला.

अखेर माणसाला सुधारायचं मीं मनांत आणलं आणि देवानं पण माझं गाऱ्हाणं ऐकलं.

सांगूं का काय झालं तें?

एकदां मला पूर आला, फार मोठा पूर आला. इतका भयंकर पूर आला कीं, तसला महापूर माणसानं कधीं पाहिला नव्हता. मग काय विचारतां?

त्या महापुरानं अनर्थ केला. त्यानं माणसाला धडा शिकविला.

माणसांमध्यें एक फार मोठी खोड आहे. संकटाशिवाय शहाणपण सुचतच नाहीं माणसाला.

ठेच लागल्याशिवाय तो खालीं कधीं पाहायचाच नाहीं!

महापूर आला नसतां तर....माणसं आळसांतच लोळत पडलीं असतीं, नसतीं भांडणं करीत बसलीं असतीं, आयतं सुख मिळविण्याची आशा करीत बसलीं असतीं. पण महापूर आला आणि माणूस जागा झाला. महापुरानं माणसाला माणसाची ओळख पटाविली.

माणूस म्हणजे कोण?

अचाट बुद्धि, अफाट शक्ति आणि अमोल शील यांचा संगम म्हणजे माणूस.

माणूस करील तें देव काय करील? माणसाचा मान मोठा, माणसाचा अधिकार मोठा, पण हिऱ्यावर चिखल माखला जावा ना! तशी माणसावर धूळ बसली होती.

कशाची?

आळसाची, आप्पलपोटेपणाची आणि जुलमीपणाची. त्यानं माणसाचं मन मळलं होतं. तो सैतान झाला होता.

मन निर्मळ ठेवणं फार कठीण!

माणसानं सारं जग जिंकलं, पण आपल्या मनावर ताबा नाहीं मिळविला. मनाला जिंकणं फार अवघड आहे. त्याला नेहमीं कामांतच गुंतवलं पाहिजे. तुमचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात ना: "आराम हराम है।"

मोकळा माणूस म्हणजे हैवानच.

पण माणसाला हें सारं पटवावं कोणीं? सांगून कळायचं नाहीं. खरं सांगितलं कीं, नाकाच्या शेंड्यावर राग तयार. आतां महापूर आला आणि त्यानं हें सारं माणसाला आपोआप पटवलं.

म्हणजे त्याचं असं झालं—

सारं कांहीं सांगतें, ऐकून घे ही कहाणी.





: ३ :

## भयंकर संकट

श्रावण महिना हा मोठा मजेदार महिना. सरसर पाऊस यायचा आणि लगेच लख्ख ऊन पडायचं. खरिपाचीं पिकं सळसळ डोलायचीं. सारं शिवार फुलून जायचं. उत्सव-समारंभांत माणसं दंग असायचीं.

नागपंचमीचा झोका झाला. पौर्णिमेला पाण्यांत नारळ पडला. गोकुळ अष्टमी आली. त्या रात्रीं एक चमत्कार घडला.

गोकुळ अष्टमीच्या रात्रीची गोष्ट. विठोबाच्या देवळांत कथा चालली होती. कथेकरीबुवा कथा सांगत होते, गोष्ट सांगत होते. गोष्ट होती गोवर्धनपूजेची.

गोकुळांत इंद्राच्या उत्सवाची तयारी चालली होती. इतक्यांत कृष्ण नंदाला म्हणाला, "यंदा आपण भूमीची पूजा करूं. जमिनीची, पर्वतांची निगा राखूं. खूप झाडें लावूं, वाढवूं, मेहनत-मशागत करूं. मग चांगला पाऊस पडेल, धान्य पिकेल, हिरवें हिरवें गवत वाढेल. गाई गुबगुबीत होतील. दूधदुभत्याची

चंगळ होईल. लोकांचं आयुष्य वाढेल आणि सगळीकडं आनदी आनंद होईल."

साऱ्या गोकुळाला हा विचार पटला. गोवर्धन पर्वताची पूजा करायला–काम करायला–सारेजण निघाले. केवढा उत्साह!

पण इकडे इंद्रदेव रागावला, त्याचा मान कमी झाला ना? त्यानें मुसळधार पाऊस सुरू केला. इंद्र हा देवांचा राजा, त्याचा राग फार भयंकर! त्यानें खूप पाऊस पाडला. एकदम महापूर आला, सारें गोकुळ वाहून जाऊं लागलें; गाई, वासरें, माणसे, घरें, सारें सारें वाहून जाऊं लागलें.

मग कृष्णानें काय केलें? त्यानें गोवर्धन पर्वत उचलला; त्या पर्वताखालीं साऱ्यांना निवारा दिला. नवी वसती उभारली. साऱ्यांनीं साथ दिली. इंद्राची फजिती झाली. तो कृष्णाला शरण आला. सारेजण आनंदानें ओरडले, "गोपाळ कृष्ण की जय!"

कथा संपली. लोक देवळाबाहेर पडले. इतक्यांत काय झालें? आभाळ काळें कुट्ट झालें. डोळ्यांत बोट घातलें तरी दिसेना. असा भयंकर अंधार झाला. कड् कड् कड् गड् गड् गड् ढगांचा गडगडाट होऊं लागला. विजा चमकूं लागल्या. राक्षसी ढग आकाशांत गडगडत धडधडत आले. एकदम मुसळधार पाऊस पडूं लागला. सारीकडे पाणीच पाणी झालें.

जुनीं घरें धडाधड पडूं लागलीं. नवीं घरें गळूं लागलीं. सारी धांवपळ सुरू झाली. एकच गोंधळ उडाला. सारे लोक गडबडून गेले. घराघरांतून, अंगणांतून, रस्त्यारस्त्यांतून, सगळीकडे पाणीच पाणी झालें.

मी दुथडी भरून गेलें. तटावरून मी उड्या घेऊं लागलें. सांखळी फुटली आणि गांवाला माझ्या पाण्याचा चौफेर वेढा

पडला. गांवांत माझ्या पुराचें पाणी शिरलें. एकच आरोळी झाली.

मी रस्त्यारस्त्यांतून फिरूं लागलें. सारे उंबरे ओलांडले, अंगण पोटांत घेतलें, घरांत शिरलें. जिभल्या चाटीत फिरूं लागलें. जणूं कांहीं मी नागिणीसारखीं फूं फूं करीत माणसं गिळूं लागलें.

केवढा हलकल्लोळ उडाला! धांवपळ, रडारड, किंकाळ्या! 'वांचवा, वांचवा! मेलों, मेलों! अग आई ग, अरे देवा....' अशा आरोळ्या उठल्या!

जो तो आपला संसार उचलीत होता, आवराआवर करीत होता, उंच उंच जागेवर आसरा शोधीत होता. धाब्यावर, माळ्यावर, झाडावर, मिळेल तेथें चढत होता. कोणाचा कोणाला मेळ नव्हता.

झोंपेंत होते ते तसेच बुडाले. जागे होते ते घाबरून बेशुद्ध पडले आणि वाहून गेले. सावध होते ते हें संकट पाहून पळत सुटले. गांवांतील उंच जागेवरल्या पाटलांच्या वाड्यांत शिरले. गढीवर चढले. अर्ध्या गांवाला पाटलांच्या गढींत आसरा मिळाला.

देवळांतला देव शांत उभा होता, डोळे मिटून तो कौतुक पाहात होता. त्याच्यासमोर कांहीं भक्त गेले. कांहींच्या अंगांत तुकाराम संचारला. टाहो फोडून त्यांनीं भजन सुरू केलें. कांहींना एकनाथांची आठवण झाली. त्यांनीं खालील धावा गाऊन देवाला आळविलें.

तें मन निष्ठुर कां केलें? जें पूर्ण दयेनें भरलें ॥ ध्रु० ॥
गजेंद्राच्या हांकेसरसें धावुनियां आलें ॥ तें मन० ॥ १ ॥
प्रल्हादाच्या भक्तीसाठीं स्तंभीं गुरगुरलें ॥ तें मन० ॥ २ ॥
पांचाळीच्या करुणावचनें कळवळुनी आलें ॥ तें मन० ॥ ३ ॥
एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें निशिदिनीं मनीं रमलें ॥ तें मन० ॥ ४ ॥

अनुक्रम ११
विभाग
नों. ७५१५

पण देव कांहीं धांवला नाहीं. माणसं मात्र धांवत सुटलीं होतीं. देव माणसांची परीक्षाच जणूं पाहात होता. तो कसलं उत्तर देणार ? माझ्या हजार जिभांनीं महापूर गांवाला गिळीत होता. माणसं घाबरून गेलीं होतीं. काय करावं तें कुणालाच सुचेना. अंधार मी म्हणत होता. पुराचं पाणी सारखं चढतच होतं.

चाऱ्याच्या–गवताच्या गंजी पाण्यावर वाहात गांव सोडून दूर निघून गेल्या. नदीच्या पाण्यावर वाढलेलीं झाडं पाण्यानं वाहून गेलीं. झोपड्या मुळासकट उपटल्या जाऊन वाहून गेल्या. घराघरांतील साऱ्या सामानाची वाताहात झाली.

खोलगट भागांत समुद्र निर्माण झाला. एकच आकान्त उडाला. दावणीला गुरं बांधलीं होतीं, त्यांपैकीं कांहीं वाहून गेलीं, कांहीं पळून गेलीं. कोण माणूस कुठें बुडाला, कोठें पळाला, अगर कोठें वाहून गेला, याचा कोणालाच पत्ता नव्हता. महापुराचं भयंकर संकट !

भाविक लोकांनीं माझ्या पुराच्या पाण्याची पूजा केली. खणा-नारळांनीं माझी ओटी भरली. पण छे ! मला दया आली नव्हती. माझ्या पुरानं कहरच केला. अनर्थाची सीमा झाली.

उंच गढीवर पाटलांच्या वाड्यांत, देवाच्या देवळावर, सामानाच्या ढिगांवर माणसांची खच्चून दाटी झाली होती. पावसानं भिजत, थंडीनं कुडकुडत, दुःखानं विव्हळत, सारीं माणसं बसलीं होतीं. त्यांची दांतखीळ वाजत होती. अंगाला गार वारा झोंबत होता. पुराचं पाणी घोंगावत होतं. अंधाराची काळोखी वाढतच होती. काळाचा विळखा आवळला जात होता. रडत, ओरडत, जीव मुठींत धरून सारेजण जगण्यासाठीं धडपडत होते, वांचण्यासाठीं मार्ग शोधीत होते.

आजवर माझं पाणी पाहिलं कीं लोक आनंदानं वेडे होत. माझ्या कुशींत दडत. आपलीं गुपितं मला सांगत. त्यांची तहान भागत असे. ते स्वच्छ होत. घरीं जात आणि त्यांचा सारा उत्साह मावळत असे. घरांत गेलं कीं त्यांना आळस येई. हा आळस मला घालवायचा होता म्हणून मी घरांघरांत शिरलें. आळस, अंधार, घाण, अज्ञान यांचीं कोळिष्टकं—सारं सारं धुऊन काढीत होतें मी. त्या सपाट्यांत मला पडझोड करावी लागली. जालीम रोगाला जालीम मात्रा हवी असं मला वाटे. त्यामुळें माणसांचे डोळे खाडकन् उघडले. कोणी भ्याले, कोणी रडले, कोणी विचार करूं लागले. त्यांची धुंदी उतरली. सामान्य माणसं तर मला शिव्याशाप द्यायला लागलीं. जगलों वाचलों तर इथं राहायचं नाहीं असं म्हणूं लागलीं.

साऱ्यांनीं मला शिव्याशाप दिले. पण आतां काय उपयोग! इतके दिवस वाया गेले. चैनींत वेळ घालविला. आजचें संकट पाहून मात्र माणूस आतां खडबडून जागा झाला, उठला आणि कामाला लागला.

काय बरं केलं त्यानं?





: ४ :

## माणुसकी जागी झाली.

माणसांनीं भीति सोडली. मनं खंबीर केलीं. हिंमत धरली. हिंमत बडी चीज आहे. हिंमतीलाच किंमत आहे. 'हिंमत मर्दा तो मदद खुदा' माणसानं धीर धरला, तर देव त्याच्या मदतीला येतो. माणसानं हिंमत धरली पाहिजे.

धाडसी माणसं पुढें सरसावलीं. त्यांनीं माझ्या पुरांत धडाधड उड्या घेतल्या. कैक बुडत्यांना वांचवलं. वाहत्यांना हात दिला. शेंकडों जणांचे जीव त्यांनीं वाहत्या पाण्यांतून ओढून काढले. त्या वीरांनीं भोपळ्यांच्या सांगडी घेतल्या. लाकडांचे तराफे मिळविले. या साधनांनीं लोक पाण्यावर तरंगत होते. हातपाय चालवीत होते. रात्रीपासून कांहीं लोक झाडावर बसले होते, घरांच्या छपरांवर अडकून पडले होते, अशा लोकांची त्या धाडसी वीरांनीं सुटका केली. काडी काडीच्या आधारासाठीं लोक ताटकळत होते; अशा लोकांची त्या धाडसी वीरांनीं मोठ्या युक्तीनें सुटका केली. निवाऱ्याच्या जागीं आतां खूप दाटी

झाली होती. वांचलेले सारे लोक त्या धाडसी वीरांचं कौतुक करीत होते, त्यांना दुवा देत होते.

महापुरानं माणसांतील माणुसकी जागी केली. एकाच तडाख्यानं माणसांतील सारीं भांडणं मिटविलीं, वैरं तोडलीं, भेदभाव मोडून काढले. आतां जो तो दुसऱ्याला मदत करूं लागला. एकमेकांना आधार देऊं लागला. धीर देऊं लागला. सारेजण एक झाले. यापूर्वी माणसांना माणसाचीच भीति वाटत होती. पण आतां माणसाला माणूस म्हणजे देवापेक्षांहि थोर वाटूं लागला.

हळू हळू अंधार कमी झाला. दिशा उजळल्या आणि चक्क फटफटलें. लोकांना एकमेकांचीं तोंडें दिसलीं. किती उदास, किती भकास, किती दुःखी चेहेरे होते ते!

मी सारं सारं पाहात होतें तें. कोणाचें मौल्यवान् सामान गेलें होतें, कोणाचें घरदार पडलें होतें, कोणाचीं गुरें मेलीं होतीं, तर कोणाचीं माणसेंच वाहून गेलीं होतीं. पण त्याला कोण काय करणार? पावसानं झोडपलं आणि महापुरानं वाहून नेलं तर तक्रार कोणाकडं न्यायची? पण आतां अंग झाडून काम केल्या-शिवाय भागणार नव्हतं. झाडून सारे कामाला लागले. माणसांनीं एकमेकांचे डोळे पुसले. तीं एकमेकांना मदत करूं लागलीं.

सूर्य हळू हळू वर चढत होता. लोकांनीं महापुराचं तें अफाट पाणी पाहिलं, त्यांच्या तोंडचं पाणी पळालं. दुःखानं ओरडून ओरडून त्यांचे कंठ कोरडे पडले होते. रडून रडून डोळ्यांतील पाणी आटून गेलं होतं.

माझ्या पाण्याच्या त्या चौफेर वेढ्यामुळं तो गांव म्हणजे एक बेटच बनलें होतें. बाहेरील जगाशीं त्याचा संबंध तुटला होता. दुसरीकडे जाण्यास मार्गच उरला नव्हता. दिसेल त्या उंच जागेला माणसं चिकटून बसलीं होतीं. भुकेनें व्याकुळ


झालीं होतीं. कशीहि स्थिति असो, भूक कुणाला सुटली आहे? भूक ही प्रत्येक जिवाची शेवटपर्यंत सोबत करणारी सांवली आहे. पण भूक शमवायला आतां त्या गांवांत कोंडाहि उरला नव्हता.

दुपार टळली. भुकेनें जीव व्याकुळ झाले. जगण्याची आशा मावळूं लागली. पण इतक्यांत काय चमत्कार झाला! जगांतली माणुसकी तिथं धांवून आली. आकाशांत विमानांची घरघर सुरू झाली. आणि काय नवल ........ त्या विमानांतून भराभर पोतीं पडूं लागलीं. कसलीं होतीं पोतीं तीं? पंच पुढारी जमले. त्यांनीं पोतीं पाहिलीं. प्रत्येक पोत्यावर लिहिलं होतं—

"महापुराच्या संकटांत सांपडलेल्या लोकांना
जनतेच्या सरकारनं ही मदत पाठविली आहे."

पंचांनीं पोतीं फोडलीं. कांहीं पोत्यांत पीठ होतं. कांहीं पोत्यांत मीठ होतं. कांहींत कपडे होते. लोकांना आनंद झाला. लोकांना आधार मिळाला. लोकांना धीर आला. पाटलांच्या गढींत चुली पेटल्या. भाकरी तयार झाल्या. लोकांना दोन घास खायला मिळाले. त्यांच्या चेहेऱ्यावर थोडा तजेला आला. महापुरानं माणसांतली माणुसकी जागृत झाली. माणुसकीचा लोंढा महापुराच्याहि लोंढ्यापेक्षां मोठा झाला. आणि त्यानें महापुराला नमवलं.





: ५ :

## सारेजण कामाला लागले.

चार दिवसांनीं पूर ओसरला. सगळीकडं गाळ पसरला, बुडालेलीं झाडं, तग धरलेलीं घरं, पडझडीचे मातीचे प्रचंड ढीग, सारं कांहीं दिसूं लागलं. सारा गांव आणि सारं शिवार गाळांतच रुतून बसलं होतं. वाहून गेलेल्या जनावरांची आणि माणसांचीं प्रेतं गाळांत अर्धवट दिसत होतीं. कांहीं झाडांना अडकलीं होतीं. केवढा भयंकर देखावा. केवढं भयंकर नुकसान. आभाळांत घारी आणि गिधाडं घिरट्या घालीत होतीं. गाळांत शिरणं त्यांनाहि जणूं धोक्याचं वाटत होतं. धाडसी वीरहि थकले होते. दुर्गंधी सुटली होती, आतां रोगराई येणार कीं काय अशी काळजी वाटत होती. सारीं माणसं वेड्यावाणी झालीं होतीं.

आकाशांतून सरकारी मदत चालूच होती. पण ती दिलेली शिदोरी किती दिवस पुरणार ?

शेवटची घटका दिसली कीं प्राण्याला जोर येत असतो. असेल नसेल तेवढं बळ एकवटून तो धडपड करीत असतो. तसंच

झालं या गांवांतल्या माणसांचं ! तीं सारीं खडबडून जागीं झालीं. त्यांनीं जगायचं ठरविलं, कष्ट करायचं ठरविलं. एकमेकांना जिवापाड मदत करायचं ठरविलं. निश्चयाचं बळ तें ! सारेजण उठले आणि कामाला लागले.

गांवचा मोठा रस्ता गाळाखालीं बुडाला होता, तो प्रथम त्यांनीं मोकळा केला आणि बाहेरच्या जगाशीं संबंध जोडला. मग काय ! माणसांना माणसं मिळालीं. ये–जा सुरू झाली. मदतीवर मदत आली. धान्य, कपडे, औषध–सारी सारी मदत आली. माणसांना माणुसकीनं वांचवलं आणि कामाला लावलं.

शेजारचीं गांवं तरी काय ? सुखांत थोडींच होतीं ! महापुराची झळ त्यांनाहि लागलीच होती. भोंवतालच्या गांवांची थोड्याफार फरकानं दुर्दशा झालीच होती. एकमेकांच्या बातम्या ऐकून आपलंच दुःख कमी आहे, असं म्हणण्याची पाळी आली. गांवकऱ्यांना खूप खूप वाईट वाटलं.

माणसं बोलत होतीं. मी ऐकत होतें—

" झालं तें गेलं. आतां यापुढं तरी असं होऊं नये. पुराच्या पाण्याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. हें वाया जाणारं आणि नुकसान करणारं पाणी आपल्या ताब्यांतच ठेवलं पाहिजे. तें कसं बरं ताब्यांत ठेवावं ? त्यासाठीं काय करावं ? कोणाची मदत घ्यावी ?— "

असे विचार सुरू झाले.

मनांत आलं तें माणसानं करून दाखविलं आहे. त्यानं वारा ताब्यांत ठेवला, तो वाऱ्यावर स्वार होऊन— विमानांतून हिंडूं लागला. त्यानं वीज हातांत घेतली, तिला घरकाम करणारी आपली दासी बनवली. तिच्याकडून प्रकाश पाडला. तिला निरोप सांगायला पाठविली. तिच्याकडून गिरण्या चालविल्या,

आगगाड्या चालविल्या. त्यानं अग्नीला कामाला जुंपलं आणि समुद्राच्या पाठीवरून प्रवास केला. त्यानं सारं जग पालथं घातलं आणि आकाशांत प्रवेश केला. अशी आहे माणसाची अचाट बुद्धि आणि अफाट शक्ति. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांपेक्षांहि माणूस थोर ठरला आहे. एकेका माणसाच्या अंगांत हजार हत्तींचं बळ आहे.

पण केव्हां ?

माणूस कामाला लागेल तेव्हां.

देवानं हें मोठं जग निर्माण केलं. त्या जगांत शेवटीं माणूस निर्माण केला. पण माणसं आपसांत भांडायला लागलीं. मग देवानं संकटं निर्माण केलीं आणि एका फटक्यांत माणसाला शुद्धीवर आणलं. नंतर त्यांच्यांतली माणुसकी जागी झाली. एकीनें माणसं कामाला लागलीं.

गांवोगांवचे लोक एकत्र आले. एकमेकांना या संकटांतून सोडविण्यासाठीं झटूं लागले.

दूरदूरच्या लोकांनीं मदत पाठविली. संकटांतल्या माणसांची सोय झाली. अन्नछत्रं उघडलीं. कपडे पाठविले. औषधं पाठविलीं.

सरकारी मदतीची तर गणतीच नव्हती. अधिकारी आले. जाणते लोक जमले. त्यांनीं योजना ठरविल्या. मार्ग दाखविला. मदत द्यायचं कबूल केलं. गांवांतल्या लोकांनीं मेहनत करायचं ठरवलं. सर्वांच्या मदतीनं आणि स्वतःच्या श्रमांनीं सुखी व्हायचं ठरवलं.


काम सुरू झालं. गाळ वाळला. वाहावलेलं, बुडालेलं सारं सारं सामान बाहेर काढलं. उकरणी तर उरकली. नदीपासून दूर अंतरावर उंच अशा जागेवर साऱ्यांनीं आपलीं बिऱ्हाडं

नेलीं. तिथं तात्पुरती वस्ती केली. आतां थोडं स्थिरस्थावर झालं. सरकारकडून पत्रे, बांबू, चटया, सारं सामान मदत म्हणून मिळालं. सारेजण नव्या जोमानं नव्या कामाला लागले. गांव-कऱ्यांनीं नवा गांव उभारायचा ठरविलं. असा छान करायचा गांव कीं साऱ्या बाजूनं अगदीं नमुनेदार.

आतां गांवकऱ्यांना उसंत मिळेना. पोटापुरतं, मिळेल तेवढं, मिळेल तेव्हां, मिळेल तसलं अन्न त्यांना पक्वान्न वाटूं लागलं. जेवण झाल्यावर चकाट्या पिटत बसण्याऐवजीं ते एकत्र येत. नव्या गांवची आंखणी करीत. नव्या कामाची वांटणी करीत. पत्रें लिहीत, निरोप देत, पायीं रखडत जात, कष्ट करीत. असं सारखं दिवस रात्र चाले. प्रत्येकजण दिलेलं काम उत्साहानं करूं लागला.

गांवकऱ्यांचा उत्साह पंतप्रधानांना कळला. ते आनंदानं आले. त्यांनीं ‘नवापूर’ गांवचा नव्या वस्तीचा पहिला दगड बसविला. नवापुराच्या बांधणीचें काम सुरू झालें.





: ६ :

# नवापूर आणि नवा पूल

लोकांनीं जुन्या गांवाचें दगड उकरून आणले. माती आणली. नव्या गांवाची आंखणी केली. नव्या गांवाचा पाया भरला. लोकांनीं निष्ठेनें कामाला सुरुवात केली. लोकांनीं भरपूर अंगमेहनत केली, हें पाहून सरकारला विश्वास पटला. लोकांच्या बरोबरीनें सरकारी अधिकाऱ्यांनींहि खर्चाची आणि कामाची जबाबदारी उचलली.

एकीचें बळ फार मोठें आणि श्रमाला जगांत फार किंमत. खर्चाच्या नव्वद टक्के रकम कर्जाच्या रूपानें आणि दहा टक्के रकम मदत म्हणून सरकारनें वांटली. त्यामुळें पूरपीडितांना मोठाच आधार मिळाला.

लोकांचे श्रम आणि सरकारच्या मदतीचा आधार यामुळें हातीं घेतलेलें काम लोकांनीं नेटानें तडीस नेलें.

लोकांनीं नव्या गांवाची नवी रचना केली. नदीपासून दूर, उंचवट्यावर, सलग व लांब-रुंद असा पट्टा होता, या उंचवट्याच्या छान जागेवर नवापूर तयार झालें.

गांवांत नव्या सुखसोयी करून घेतल्या. लोकांनीं आपल्या श्रमदानानें नवी वस्ती उभारली. नव्या वस्तीला नवीन नांव दिलें ' नवापूर. ' गांवांतील सारे रस्ते सरळ आंखले. रस्ते रुंद, पक्के आणि सपाट केले. चौकाचौकांतून टिळक, गांधीजी, महात्मा फुले अशा थोर पुरुषांचे पुतळे उभारले. सारीं घरें सारख्या आकाराचीं बांधलीं. भेदभाव कोणताच ठेवला नाहीं. हरिजनांची वस्ती वेगळी काढली नाहीं. तीं का माणसें नाहींत? हिंदु–मराठे, माळी, हरिजन, मुसलमान, ख्रिश्चन, जैन, मारवाडी सारेजण भाऊ भाऊ, जातिभेद विसरून जाऊं. सारेजण एका दिलानं आणि एका मेळानं एकत्र राहूं. हेंच साऱ्या गांवकऱ्यांचं एकमत. ना कोणी श्रीमंत ना कोणी गरीब.

हें सारं महापुरानं शिकविलं. भेदाभेदावर पाणी पडलं. माणसाला माणसानं ओळखलं. साऱ्या गांवकऱ्यांचं एकमेकांशीं नातं जडलं. रामजी, तो बघ नवापूरच्या वेशीवर नवा फडकणारा झेंडा. एकीचा आणि नेकीचा, श्रमाचा आणि प्रेमाचा, सुख-शांतीचा आणि समाधानाचा. नवापूरच्या वेशीवर आतां हा माणुसकीचा झेंडा फडकत आहे.

नवापुरांतील घरें बांधून झालीं. माणसें त्या नवीन घरांत राहूं लागलीं. झालं गेलं विसरून गेलीं. नव्या आशा पालवल्या. नव्या विचारांचं नवीन वारं सुरू झालं.

तें पाहा सर्वोदय मंदिर! सर्वांचं हें एकच मंदिर. दर शुक्रवारीं सारे लोक तेथें एकत्र जमतात. प्रार्थना करतात, सूत कांततात. इथं दररोज सफाई होते. किती स्वच्छ आहे हें मंदिर. निर्मळ मनाचा हा आरसाच. अशीं सर्वोदय मंदिरं गांवोगांव झालीं पाहिजेत.

ती बघ नवी शाळा. जीवनविद्येचें तें उद्योग-मंदिर. ही शाळा म्हणजे गांवचं कल्याणकेंद्र आहे. सारे गांवकरी संध्याकाळीं

रोज येथें जमतात. नंतर गुरुजींच्याकडून नवीन विचार ऐकतात. नवीन गोष्टी ऐकतात. आपले दोष घालवितात. चांगल्या आचार-विचारांचे धडे घेतात. इथेंच गांवचे सारे सण साजरे होतात. सारे गांवकरी एकत्र जमून उत्सव साजरे करतात. गांवचीं सगळींच कामं एकीनं आणि सहकार्यानं होतात.

'एकमेकां साहाय्य करूं। अवघे धरूं सुपंथ ॥'

हें नवापुरांतील लोकांना चांगलं समजलं आहे.

आतां गांवांत कुणी आळशी नाहीं. कुणी बेकार नाहीं. कुणी व्यसनी नाहीं. कुणी निरक्षर नाहीं. मला आलेल्या त्या महापुरापासून नवापूर हें गांव अगदीं नवें बनून गेलें आहे.

महापुराचं नांव काढलं कीं अजूनहि साऱ्या लोकांच्या अंगावर कांटा उभा राहतो. माझी—नदीची—त्यांना आठवण होते आणि नवी वस्ती केली तरी मला येणाऱ्या पुराचा योग्य बंदोबस्त करण्याचे विचार त्यांच्या मनांत येतात.

रामजी, तसं म्हणशील तर लोक माझ्या बाबतींतहि कांहीं गप्प बसलेले नाहींत. तो बघ नवा पूल ! नवापूर गांवांतील लोकांनींच तो पूल बांधला आहे. पूल म्हणजे नदीच्या दोन तटांचा एकजीव. माझे दोन तट एकमेकांना कधींच मिळत नव्हते. पण नवापुरांतील माणसांनीं माझ्यावर पूल बांधून ते मिळविले किती थोर विचार ! या पुलामुळं माझा नूरच पालटला.

पूर्वीं माझ्यांतून – नदींतून – या तीरावरचें त्या तीरावर जातांना पावसाळ्याच्या काळांत एखादा माणूस वाहूनहि जाई. पण आतां ती अडचण नाहींशी झाली.

रामजी, या पुलावर थोडा वेळ उभा राहा. आतां थोडी माझी शोभा तर पाहा. हें पाहा, नवीन बांधलेले बांध ! माझ्या दोन्ही तटांना कसे छान आणि मजबूत बांध घातले आहेत.


मला दोन ठिकाणीं घाटहि बांधले आहेत. वरच्या बाजूचा तो पिण्याचें पाणी भरण्यासाठीं आणि हा खालच्या बाजूचा आंघोळीसाठीं आणि कपडे धुण्यासाठीं.

पूर्वींचीं माणसं माझ्यासारख्या नदीला घाट बांधीत आणि तेंच मोठं पुण्य समजत, त्यांतलं गुपित लोकांना आतां कळून आलं.

पूर्वींचे लोक खरे विचारी होते. ते आपल्या भोंवतालच्या माणसाचं कल्याण होण्यासाठीं तन-मन-धनानं झटत असत. बरोबरच आहे. काम करील तोच खाईल. आळशी राहील, चैन करील, तो नाहींसा होईल.

गांधीजींनीं सुद्धां लोकांना हेंच सांगितलं. नुसतं सांगितलं नाहीं. आधीं केलं आणि मग सांगितलं. त्यांच्या या थोर शिकवणुकीचा उपयोग साऱ्या जगाला झाला आहे.

त्यांनीं सांगितलेल्या रस्त्यानं आपण गेलों तरच कल्याण आहे. जगांतल्या देशांतल्या अनेक तटांना जोडणारा गांधींचे विचार हा नवा पूल आहे. म्हणूनच नवापूरच्या नव्या पुलाला गांधींचं नांव दिलं आहे. माझ्यावरच्या पुलाला दिलेल्या बापूजींच्या नांवामुळं मलाहि धन्यता वाटली !





: ७ :

## पाणीच पाणी

दोन ऑक्टोबरचा दिवस. गांधीजयंतीची गोष्ट. शाळेंत मोठी सभा झाली. गांधीजींच्या पुतळ्यासमोर गुरुजींनीं माहिती सांगितली. "आपल्या सरकारनं आपला देश सुधारण्याची एक मोठी योजना आंखली आहे. पांच पांच वर्षांचा असा एकेक हप्ता. असे पांच हप्ते करायचे. आपल्या देशाचं सर्व बाजूंनीं कल्याण करायचं. जगांत भारताला मानाचं मोठं असं स्थान मिळवून द्यायचं. सारे लोक सुखी करायचे. साऱ्या लोकांना शिकवून शहाणं करायचं. सहीचा निशाणी अंगठा म्हणजे आपल्या माणुसकीला डाग. तो डाग साफ धुवून काढावयाचा. सर्व लोकांची गरिबी हटवायची. सर्वांना भरपूर काम द्यायचं कोणालाहि आतां अडाणी, आळशी, उपाशी, राहूं द्यायचं नाहीं. कोणाचाहि छळ होऊं द्यायचा नाहीं. कोणाचीहि पिळवणूक होऊं द्यायची नाहीं. गरीब–श्रीमंत, मजूर–मालक, स्पृश्य–अस्पृश्य, आहेरे–नाहीरे, असे वर्गभेद देशांत ठेवावयाचे नाहींत.

साऱ्यांना सारखाच मान द्यायचा. सर्वांना सारखंच सुख मिळवून द्यायचं. आतां कोणालाहि भुकेनें मरूं द्यायचं नाहीं. आपल्या जगण्यासाठीं दुसऱ्या देशाच्या तोंडाकडं पाहायचं नाहीं. आपले आपण आपल्या पायावर जगायचं, कष्ट खूप करायचे आणि आपला उद्धार आपणच करायचा. आपल्या हातांनींच आपलं सुख शोधायचं, मिळवायचं म्हणूनच आपल्या सरकारनं ही पांच पांच वर्षांची योजना आंखली आहे. ती नीट समजून घेतली पाहिजे. आणि खूप मेहनत घेऊन ती यशस्वी केली पाहिजे.

आपला देश म्हणजे शेतकऱ्यांचा देश, शंभरांतले ऐंशी लोक निव्वळ शेतीवरच जगतात. देशांत एकंदर छत्तीस कोटी लोक आहेत म्हणजे त्यांतले सत्तावीस कोटी शेतीवर जगतात. इतक्यांना मानानं जगायचं. सुखानं जगायचं म्हणजे साधी, सोपी गोष्ट नाहीं. यासाठीं कशी तरी शेती करून आतां भागायचं नाहीं. सुधारलेल्या पद्धतीनं. समजून उमजूनच आतां शेती केली पाहिजे, तरच तरणोपाय आहे. आणि म्हणूनच सरकारनं पहिली गोष्ट कोणती केली?

शेती सुधारण्याची.

शेती सुधारण्याच्या या योजनेला पहिल्या पंचवार्षिक योजनेंत पहिला मान दिला. पहिल्यांदा शेती सुधारायची. खूप पैसा उभारायचा. शेतीवर खूप खर्च करायचा. नद्यांना धरणं बांधायचीं. मोठमोठे पाट काढायचे. नद्यांच्या पुराचं वायां जाणारं पाणी अडवून ठेवायचं. पाण्याचा खूप मोठा सांठा करायचा. मग शिवारांत सगळीकडं पाणीच पाणी खेळवायचं. भरपूर पाणी, भरपूर पीक.

असा सरकारनं विचार केला, योजना केली आणि कामंहि केलीं. पंजाब भागांत भाक्रा-नानगल हें प्रचंड धरण बांधून

झालं. ओरिसामध्यें दामोदर नदीवर हिराकूड धरण बांधून झालं. याशिवाय काकडापारा, गंगापूर–कोयना अशा निरनिराळ्या भागांत खूप मोठमोठीं धरणं बांधायच्या योजना आंखल्या. गांवोगांवच्या छोट्या नद्यांनाहि छोटीं धरणं बांधायची योजना आहे. कांहीं बांधलीं गेलीं. तेथें लोकांनीं खूप कष्ट केले. त्यामुळं शेती सुधारली. खूप धान्य पिकलं. आतां अन्नधान्यासाठीं परदेशाच्या तोंडाकडे पाहायची जरुरी नाहीं.

अशी शेती सुधारली. मग आतां दुसऱ्या हप्त्यांत उद्योग-धंदे सुधारायचे. नद्यांचीं मोठमोठीं धरणें आहेत, त्यांवर वीज उत्पन्न करायची, खेड्यापाड्यांतून ती वीज खेळवावयाची, छोटे छोटे उद्योगधंदे त्या विजेवर चालवावयाचे, पक्क्या मालाचें उत्पादन वाढवावयाचें, तयार झालेला हा माल भारताबाहेर पाठवायचा. भारताच्या पक्क्या मालाला जगांत बाजारपेठ उत्पन्न करायची.

आलेल्या संधीचा फायदा घ्यायचा. हात चालवायचें. काम करायचें. देशाचा नांवलौकिक वाढवायचा आणि आपल्या नव्या पुराची प्रगति करून घ्यायची. कच्चा माल भारताबाहेर पाठविण्यापेक्षां पक्का मालच जगांत पाठवायचा. त्यासाठीं उद्योगधंदे वाढवायचे.

आपला नवापूर गांव फार मेहनती आहे. महापुराच्या संकटाला त्यानं तोंड दिलं आणि एकीनं कष्ट करून गांवाची नवी वसाहत केली. आतां गांवाची वस्ती बिनधोक झाली. पण शेती सुधारली पाहिजे. ग्रामोद्योग वाढवले पाहिजेत. त्यासाठीं मी म्हणतों कीं आपल्या गांवाच्या नदीला वेसण घालावी. धरण बांधावं. पाट काढून शिवारांत पाणी खेळवावं. ज्या नदीचं पाणी बेफाम होऊन गांवेंच्या गांवें गिळतं, त्या पाण्याला नुसते

बांध घालून फुकट कां पाणी वाहूं द्यायचं! त्या वाहून जाणाऱ्या पाण्याचा आपण उपयोग करून घेतलाच पाहिजे. आपण धरण बांधूं, पाट काढूं. शेती सुधारूं. बागायत करूं आणि सुखी होऊं."

गुरुजींचा हा विचार साऱ्या गांवकऱ्यांना एकदम पसंत पडला. आणि मग काय बाबा, लगेच काम सुरू झालें. घरो-घरची एकेक गाडी आणि दोन दोन गडी कामावर आले. साऱ्या गांवची एक आरोळी, आसपासच्या पांच सात गांवांनीं एक होऊन धरण बांधायचं ठरवलं.

सरकारनं जाणतीं माणसं पाठवून पाहणी केली अधिकारी पाठविले. पैसा ओतला. सारे गांवकरी आनंदानें झटले. कामाची शुभ सुरुवात म्हणजे अर्धी फत्तेच!

पंतप्रधान पुन्हां आले, त्यांनीं भूमिपूजा केली आणि पायाची पहिली कुदळ मारली. हजारों लोकांनीं कामाची तळी उचलली. काय तो देखावा! तें श्रमदान पाहून मी तर लाजून थिजलेंच.

नवापूरपासून वरच्या बाजूला पांच मैलांवर धरणाचें काम सुरू झालें. शेंकडों लोक खणीत होते. शेंकडों लोक उकरीत होते. शेंकडों दगड वाहून आणीत होते. कोणी कॉंक्रीट बनवीत होते. कोणी गवंड्यांच्या हाताखालीं कामें करीत होते. असें एक ना दोन! जाणत्या इंजिनिअरांच्या हाताखालीं हजारों लोक रात्रंदिवस खपत होते. एकच ध्यास! एकच आस!

वानरांनीं लंकेला जातांना समुद्रावर सेतु बांधला होता. त्या वेळीं लहानशा खारीनं त्या कामांत मदत केली. ती पाहून रामाला कौतुक वाटलं होतं. तसंच या धरणबांधणीच्या कामांत लहान लहान बालकांनींहि हातभार लावला. त्यांच्या पाठीवरून हात फिरवायला इथं कोणीहि राम दूर उभा नव्हता. इथले सारे


राम प्रत्यक्ष कामच करीत होते. रामराम घालायलाहि कोणाला सवड नव्हती. सतत काम काम काम !

सारीं माणसं जिवाचं रान करीत होती. पाण्याला कोंडून धरीत होतीं. शिस्तीत राहायला लावीत होतीं. माणसानं पुढं जावं आणि पाटानं मागून पाणी आणावं असं चाललं होतं. हें होईपर्यंत कोणी विसावलं नाहीं, कोणी आळसलं नाहीं. रुसलं नाहीं, रागावलं नाहीं. कारण, 'महापूर' म्हटलं कीं साऱ्यांच्या जिवाचं पाणी पाणी व्हायचं !

दोन वर्षांत माझ्यावरचं धरण बांधून झालं. पाट निघाले. पाटांतून पाणी वाहूं लागलं. नवापूरचं सारं शिवार आतां भिजून तर्रर्र झालं, हिरवंगार झालं, पिकांनीं फुलून गेलं, फुला-फळांनीं बहरून गेलं.

माणसाची करणी आणि शिवारांत पाणीच पाणी.





: ८ :

## सुखी जीवन

विभाग
क्रमांक
नों. दि.

अशी आहे बाबा माझी कहाणी ! मला वाटायचं माणूस म्हणजे भयंकर प्राणी. पण आतां तो ठरला गुणांची खाणी ! खरं सांगूं, मला जें साधायचं होतं तें साधलं. माझं सार्थक झालं. आतां माझ्या थेंबाथेंबाचा लोकांना चांगला उपयोग होतो. हीच माझी इच्छा होती. याच आशेनं मी जन्मलें, जगलें, आणि जगत आहे. जगावं आणि जगवावं हेंच माझं ध्येय !

पाणी म्हणजे जीवन ! माझ्या जीवनानं लोकांचंहि जीवन सुखी होत आहे, त्यांतच मला आनंद वाटतो. नाहीं तरी माझं जीवन परोपकारासाठींच आहे ना ! रात्रंदिवस, तिन्ही त्रिकाळ माणसांच्या, पशुपक्ष्यांच्या, वनस्पतींच्या, झाडाझुडपांच्या, उपयोगीं पडावं आणि धन्यता मिळवावी. यांतच माझं मोठं यश नाहीं का ?

महापुरानं माझ्या जीवनाचा विकास केला, लोकांना चांगलाच धडा दिला. मग लोकांनीं जिवाचा धडा केला.

मला सारं रान मोकळं करून दिलं. आतां मी माझ्या पात्रांतच राहिलें नाहीं ! माझ्या उपकाराचं क्षेत्र वाढलं. माझं पाणी शेतां-शेतांतून नाचूं खेळूं लागलं. पाटांमुळं मला शिस्त लागली.

आतां माणसांना पाहिजे तिकडं माझं पाणी नेतां येतं. त्यांना पाहिजे तेवढं रान भिजवितां येतं. त्यांना खूप धान्य पिकवितां येतं. त्यांना काळावर मात करतां येते. त्यांना खूप सुख मिळवितां येतं. माणसांना माझ्यामुळं सुख मिळालं आणि मीहि लोकांच्या सुखानेंच सुखी झालें.

आतां माझ्याकडे कोणीहि आलं तरी मी त्याला माझी ही कहाणी आनंदानें सांगतें. मला या नवापूरचा अभिमान आहे. नवापूरच्या लोकांना मीं जागं केलं आहे आणि माझ्या-मुळं त्यांनींहि आपलं जीवन सुखी करून घेतलं आहे.

खरं सुख कशांत आहे? दुःखांतून खरं सुख सांपडतं. संकटांतूनच सुखाचा रस्ता सांपडतो. आपले पंतप्रधानसुद्धां धरणाच्या पायाचा दगड बसवितांना असंच म्हणाले होते, "अनेक संकटांना धीरानं तोंड द्या. म्हणजेच जीवन सुखी होईल. ऐदीपणा, भीति, आळस, बेकी, भेदाभेद, तंटे, सारं सारं सोडा आणि काम करा. कष्ट करा. आराम हराम है."

हे त्यांचे बोल किती मोलाचे आहेत ! माणसानं कष्ट करूनच जगलं पाहिजे. माणसानं माणुसकीनं जगलं पाहिजे.

नवापूरच्या लोकांनीं पंतप्रधानांचे हे बोल खरे करून दाखविले. भारतापुढें त्यांनीं आपल्या वागणु-कीचा आरसाच ठेवला. त्यांच्यासारखं वागून प्रत्येकानं सुख मिळविलं पाहिजे.



पुराच्या पाण्यानं सगळीकडं पाणीच पाणी करून नाश केला होता. पण त्या

नाशांतच सुखाचं बीज वाहून आणलं होतं. लोकांनीं पुरावर मात केली. माझ्या नाकांत धरणाची वेसण घातली आणि साऱ्या खोऱ्यांत शेतीच्या उपयोगास पाणीच पाणी करून टाकलं.

"उदंड जाहलें पाणी । शेती पिकवावया"

माझ्या तटावर शहाण्या, विचारी आणि मेहनती लोकांचा गांव आहे याचा मला आनंद होतो; अभिमान वाटतो. परवांच कोणीतरी परदेशचे पाहुणे इथं आले होते. त्यांना नवापूरचे सरपंच माझ्यावरील गांधीपूल दाखवीत होते. त्या वेळीं मीं त्यांच्या तोंडून ऐकलं कीं, "आम्ही आतां लौकरच धरणावर इंजिन बसवणार आहोंत. पिण्याचं पाणी फिल्टर करून शुद्ध करणार आहोंत आणि तें नळानं गांवांत नेणार आहोंत."

छान होईल ! नवापुरांत पिण्याच्या पाण्याची छान सोय होईल. रोग दूर पळतील.

नाहींतरी आतां गांवांत घाण कुठंहि नाहीं. गटारें सुद्धां चांगलीं बांधून काढलीं आहेत. सांडपाणी गांवाबाहेर दूर नेलं आहे. त्या पाण्यावर केलेल्या सामुदायिक शेतींत गांवचा भाजीपाला तयार होत आहे.

आतां धरणावर म्हणे वीज तयार होणार. म्हणजे मग नवापुराला नवा प्रकाश मिळणार ! नवे छोटे उद्योगधंदे जोरानें चालणार. लोक उद्योगी होणार. सुखी होणार.



आतां शेवटीं आणखी एक बातमी सांगतें. नवापूरची सारी जमीन गांवांतील जमीनदार भूदानांत पूज्य विनोबांना देऊन टाकणार. म्हणजे मग सारी जमीन कसणारांची. गांवाच्या मालकीची. आतां इथं सामुदायिक शेती होणार. सहकारी शेती आणि सहकारी

उद्योगधंदे. यालाच म्हणतात, समाजवादी समाजरचना! समाजवादी समाजरचनेंत हा नवापूर गांव थोर मानकरी होणार! आणि हे सारं घडण्याची सुरुवात झाली, ती माझ्या पुराच्या पाण्यानं बरं का?

ऊठ, रामजी, ऊठ. सरली माझी कहाणी. तूं ऐकलीस तशी ती साऱ्या गांवांना ऐकूं दे. तूं सांग, मी सांगतें. आणि सर्वांना हा असा श्रमदानाचा वसा घ्यायला विनवितें. जय हिंद!

☆ ☆ ☆

नदीची धार खळखळ वाहात होती! गार वाऱ्याची झुळूक रामजीच्या अंगावरुन गेली. रामजी जागा झाला. केवढं स्वप्न त्याला पडलं होतं. तो नदीजवळ गेला. त्यानं डोळ्याला पाणी लावलं. त्यानं चूळ भरून टाकली. तो घटां घटां पाणी प्याला. त्याचें पोट भरलें. नदीच्या कहाणीनें त्याच्या मनाला उत्साह वाटला.

आपल्या घोड्याला त्यानें शीळ घातली. घोडा आला. रामजी घोड्यावर बसला आणि हां हां म्हणतां दूर निघून गेला.

रामजी जिथं जिथं जातो, तिथं तिथं ही नदीची कहाणी खुलवून सांगतो.



IRBK-0106252
IRBK-0106252
विभाग